दैनिक लोकमत दि 06/01/22

चोरीच्या ८ दुचाकी जप्त

# भोकरमध्ये आणखी एका दुचाकी चोरास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**भोकर :** येथील पोलिसांनी काही दिवसांपूर्वी दोन दुचाकी चोरांना अटक करून त्यांच्याकडून तब्बल १६ दुचाकींचा छडा लावल्यानंतर आता आणखी एकास अटक करून ८ दुचाकी जप्त केल्याची कामगिरी केली.

मागील काही दिवसांपासून पोलीस स्टेशन भोकर व परिसरातून मोठ्या प्रमाणात दुचाकी चोरीचे प्रकार वाढले होते. याची दखल घेऊन पो.नि. विकास पाटील यांनी चोरीचा छडा लावण्यासाठी पोहेका दिलीप जाधव, पोहेका माधव पाटील, नापोकॉ. व्यंकट आलेवार यांचा समावेश असलेले गुन्हे शोध पथक तयार केले होते. सदरील पथकाने तपास करून आरोपी शेख आयास शेख बरकतअली (रा. के.आर.के. कॉलनी अदिलाबाद) यास अटक करून त्यास अधिक विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली देऊन चोरलेल्या ८ मोटारसायकली (एकूण किमत २ लाख ६० हजार) पोलिसांना काढून दिल्या. त्यामध्ये पोलीस स्टेशन भाग्यनगर येथे गुन्हा दाखल असलेली दुचाकी (क्र. एमएच २६ एएम ९११९), पोलीस स्टेशन विमानतळ येथे गुन्हा दाखल असलेली दुचाकी (क्र. एमएच २६ एवाय १०६४), पोलीस स्टेशन भोकर येथे गुन्हा दाखल असलेली दुचाकी ( क्र. एमएच २६ एजी ०६३०), पोलीस स्टेशन इस्लामपूर येथे गुन्हा दाखल असलेली दुचाकी (क्र. एम एच २६ वाय ४८०८), आणि तेलंगणा राज्यातील म्हैसा, तामसी येथील २ गाड्या व इतर राज्यांतील २ अशा एकूण ८ दुचाकी गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत. पुढील तपास पोनि. विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ दिलीप जाधव करीत आहेत.

